पुण्य नगरी

# पुण्यातील महिलेच्या मानेतून एक किलोची थायरॉईडची गाठ काढली

**पाच तास चाललेली शस्त्रक्रिया यशस्वी : दोन वर्षांपासूनच्या त्रासातून झाली सुटका**

**पुणे** : पुण्यातील एका ३३ वर्षीय रुग्ण महिलेच्या मानेतून १ किलो वजनाची थायरॉईड गाठ काढण्यात डॉक्टरांना यश मिळाले आहे. लीलावती रुग्णालयातील थायरॉईड आणि एंडोक्राइन सर्जन डॉ. रितेश अग्रवाल, कार्डियाक सर्जन डॉ. कृष्णा प्रसाद आणि ईएनटी सर्जन डॉ. प्रीती धिंग्रा, डॉ. वैभवी बक्षी यांच्या नेतृत्वाखाली एका टीमने ही यशस्वी शस्त्रक्रिया केली आहे. साधारणतः पाच तास ही शस्त्रक्रिया सुरू होती.

प्रिशा शेट्टी (नाव बदललेलं) या पुण्यातील रहिवासी आहेत. या महिलेला गेल्या २ वर्षांपासून तीव्र श्वसनाचा त्रास जाणवत होता. अनेक डॉक्टरांकडून उपचार घेतले. परंतु, प्रकृतीत सुधारणा होत नव्हती. महिलेची बिघडती प्रकृती लक्षात घेता कुटुंबीयांनी त्यांना मुंबईतील लीलावती रुग्णालयात दाखल केले. या ठिकाणी वैद्यकीय चाचणीनंतर महिलेच्या मानेमध्ये गाठ असल्याचे दिसून आले. त्यानंतर एक्स-रे, सीटी स्कॅन आणि थायरॉईड फंक्शन चाचण्या करण्यात आल्या. त्यानंतर महिलेवर शस्त्रक्रिया करण्यात आली.

याबाबत डॉ. रितेश अग्रवाल यांनी सांगितले, की गॉइटर ही एक अशी स्थिती आहे. जिथे गाठी तयार झाल्यामुळे किंवा सूज वाढल्याने थायरॉईड ग्रंथीची वाढ होते. या महिलेला थायरॉईड ग्रंथी वाढून गलगंड झाले होते. तेव्हा ते श्वसननलिकेवर दाब येतो. ज्यामुळे योग्य ऑक्सिजन पुरवठा होत नाही आणि रुग्णांना श्वासोच्छ्वासाच्या समस्यांना सामोरे जावे लागते.

रुग्ण प्रिशा शेट्टी यांनी सांगितले, की मानेत थायरॉईडची गाठ असल्याने मला श्वास घ्यायला त्रास जाणवत होता. अनेक डॉक्टरांकडून उपचार घेतले. परंतु, प्रकृतीत सुधारणा झाली नाही. मात्र, लिलावती रुग्णालयातील डॉक्टरांनी तातडीने शस्त्रक्रिया करून मानेतून गाठ यशस्वीरीत्या काढून टाकली आहे. या शस्त्रक्रियेनंतर आता मी अडचणीशिवाय श्वास घेऊ शकत आहे.


Powered by: erelego.com